## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

( सकाळ )

जा.क्र.२४९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०४/२०१७

### १) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०४/०४/२०१७ चे २१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घराचे मधल्या खोलीत खाटेवर झोपली असता यातील आरोपी हा अनाधिकृतपणे तिच्या घराचे मधल्या खोलीत जावुन फिर्यादीस करू दे असे म्हणुन फिर्यादीचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ४५२,३५४(अ) २ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहे.

### २) एसटी मधुन प्रवास करणाऱ्या महीलेच्या हॅन्ड बॅग मधुन सोन्याचे दागीने व पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०३/०४/२०१७ चे २४.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी सौ. ललीता देवंद्र पडोळे वय ५१ वर्ष, रा. जमनालाल बजाज वार्ड सॉमील चे मागे भंडारा ही आपले पती सोबत भंडारा वरून नागपुर तुमसर एसटी बसने तुमसर कडे जात असता प्रवासात कोणीतरी अज्ञात चोराने हॅन्ड बॅगची चैन खोलुन त्यातील ०१ सोन्याचे मंगळसुत्र वजन ०३ तोडे किंमती ६०,०००/—रू.,०१ चपलाकंठी वजन ०३ तोडे किंमती ६०,०००/—रू.,व नगदी २०००/—रू. ची नोट असा एकुन १,२२,०००/—रू.चा माल कोणीतरी चोराने चोरून नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

### ३) क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ,गालाचा चावा घेवुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०४/०४/२०१७ चे २१.०० वा. दरम्यान यातील आरोपीचा लहान भाऊ रॉकेश शिंदे वय २२ वर्ष हा फिर्यादीस शिवीगाळ करित असता फिर्यादीने त्यास हटकले असता आरोपी हा फिर्यादीचे अंगावर मारण्यास धावला तेव्हा फिर्यादीने त्यास जमिनीवर पाडले तेव्हा आरोपीने फिर्यादीचे डावे गालावर दाताने चावा घेवुन जखमी केल्याने फिर्यादी मंगेश वासुदेव शिंदे वय २५ वर्ष रा. रामपुरी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहे.

**६) अवैध दारु अडयांवर धाडी .  :—**

दिनांक०५/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. करडी, तुमसर,सिहोरा,आंधळगाव, अडयाळ व दिघोरी येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १२७ लिटर हातभट्टी दारु किंमती ६,९००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
**दुरध्वनी.क्र.८८०५१०१११२**

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.